# नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

## महानगरपालिका भवन, श्री. गुरु गोबिंदसिंघजी स्मारक रुग्णालयासमोर, नांदेड-४३१ ६०१

दूरध्वणी: ०२४६२ २३४७१० संकेत स्थळ: www.nwcmc.gov.in इ मेल: info@nwcmc.gov.in

**Tender Notice No.:- NWCMC/(PWD) E-Tender/214/2026 Dt.07.04.2026**

आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड हे खाली दर्शविण्यात आलेल्या कामांकरिता महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडुन B-1 नमुन्यात निविदा मागवित आहेत. या निविदा फक्त वेबसाईट https://mahatenders.gov.in वरुन खरेदी करता येईल. निविदेच्या अटी व शर्ती वरील वेबसाईटवर नमुद असतील निविदा फक्त इंटरनेटवरुन खरेदी करता येतील व इंटरनेटवरुन भरता येतील. सर्व कंत्राटदाराना Digital Signature चे रजिस्ट्रेशन करणे अनिवार्य आहे.

ई-निविदा प्रक्रियेचे वेळापत्रक

| अ.क्र. | तपशिल | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| १ | **ई-निविदा प्रकाशित करणे** | 09.04.2026 | १५.०० |
| २ | **ई-निविदा डाऊनलोड करणे** | 09.04.2026 | १५.०० |
| ३ | **ई-निविदा भरणे** | 09.04.2026 | १५.०० |
| ४ | **ई-निविदा भरण्याचा अतिम दिनांक व वेळ** | 16.04.2026 | १५.०० |
| ५ | **ई-निविदा उघडणे** | 20.04.2026 | १५.०० |

| टेंडर क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय किंमत रक्कम रु. | इसा-याची रक्कम रु. १%/०.५% | सुरक्षा अनामत रक्कम रु. २%/१% | को-यानिविदेची किंमतविक्रीकय सहीत - २८% (GST) | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | नांवाशमनपा हद्दीत प्रभाग क्र.०८ मधील शिवाजीनगर भागात श्री. महेश देशमुख यांचे घर ते संतोष पत्तेवार यांचे घर ते अगृवाल निळीवार पर्यंत नाली करुन स्लॅब टाकणे. | 1083113/- | 11000/- | 22000/- | 640/- | 6 महिणे |
| 2 | नांवाशमनपा हद्दीत प्रभाग क्र.०७ मध्ये श्रावस्तीनगर भागात शेख जावेद यांच्या घरापासुन ते मुख्यनाल्यापर्यंत सी.सी. रोड करणे. | 487720/- | 5000/- | 10000/- | 640/- | 6 महिणे |
| 3 | नांवाशमनपा हद्दीत श्वान निर्बीजीकरण केंद्रा म्हळजा येथे टिन शेड बांधकाम करणे. | 2808154/- | 29000/- | 58000/- | 640/- | 6 महिणे |
| 4 | नांवाशमनपा हद्दीतील झोन क्र.०३ मध्ये वार्षिक देखभाल दुरुस्ती जसे रस्ती दुरुस्ती, नाली दुरुस्ती, विविध सण, जयंती, पुण्यतिथी, उत्सव निमित्त कामे करणे. | 8428859/- | 85000/- | 170000/- | 1280/- | 12 महिणे |
| 5 | नागरी दलितेत्तर वस्ती सुधार योजने अंतर्गत नांवाशमनपा हद्दीत प्रभाग क्र. १८ (ब) खडकपुरा भागातील विविध ठिकाणी LED पथदिवे तसेच आवश्यकतेनुसार सोरऊर्जा पथदिवे बसविणे. | 2796460/- | 28000/- | 56000/- | 640/- | 6 महिणे |
| 6 | नागरी दलितेत्तर वस्ती सुधार योजने अंतर्गत नांवाशमनपा हद्दीत प्रभाग क्र. ०८ मध्ये अलिभाई टॉव्हर शिवाजी नगर ते श्री. सुर्यवंशी यांच्या घरापर्यंत (गोकुळ नगर) सी. सी. रस्ता करणे. | 420897/- | 5000/- | 10000/- | 640/- | 6 महिणे |
| 7 | नागरी दलितेत्तर वस्ती सुधार योजने अंतर्गत नांवाशमनपा हद्दीत प्रभाग क्र. ०५ मध्ये बाबु भाई यांचे घर ते साजेद यांचा घरासमोर गल्ली नं.२० येथे सी.सी. रस्ता करणे. | 420873/- | 5000/- | 10000/- | 640/- | 6 महिणे |
| 8 | नागरी दलितेत्तर वस्ती सुधार योजने अंतर्गत नांवाशमनपा हद्दीत प्रभाग क्र. १८ मध्ये वाघी रोड ते महेमुद खान फंक्शनरोड हॉलच्या पाठीमागचा रस्ताकरणे. | 836506/- | 9000/- | 10000/- | 640/- | 6 महिणे |
| 9 | नागरी दलितेत्तर वस्ती सुधार योजने अंतर्गत नांवाशमनपा हद्दीत शगुन सिटी कमान ते कौठा मुख्य रस्ता पर्यंत सी.सी.रस्ता करणे. | 21585566/- | 108000/- | 216000/- | 1280/- | 6 महिणे |
| 10 | नागरी दलितेत्तर वस्ती सुधार योजने अंतर्गत नांवाशमनपा हद्दीत गोबिंद बाग साहिब रोड व गुरुव्दारा परिसरात व गुरुव्दारा गेट नं.०१ ते बंदाघाट मुख्य व अबचलनगर रस्त्यावर प्रखर विद्युत पथदिवा व्यवस्था करणे बाबत. | 20830474/- | 105000/ - | 210000/ | 1280/- | 6 महिणे |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | 11 | नागरी दलितेत्तर वस्ती सुधार योजने अंतर्गत नांवाशमनपा हद्दीतील प्रभाग क्र. ०६ मध्ये गणेश नगर, यशवंत नगर व काबरा नगर येथे विविध ठिकाणी सी.सी. रस्ते व सी.सी. नाली करणे. | 8513373/- | 86000/- | 172000/- | 1280/- | 6 महिणे |
| | 12 | नागरी दलितेत्तर वस्ती सुधार योजने अंतर्गत नांवाशमनपा हद्दीतील प्रभाग क्र.१९ (अ) मध्ये असर्जन भागातील वरदनगरी भागातील मुख्य सी.सी. रस्ता करणे व आर सी.सी. नाली करणे. | 8528991/- | 86000/- | 172000/- | 1280/- | 6 महिणे |
| 1273627-1 | 13 | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजने अंतर्गत नांवाशमनपा हद्दीत प्रभाग क्र.१७ मध्ये गुरुव्दारा येथे बाबाभाई कांचवाले यांचे घर ते प्रदिपसिंघ भोसीवाले यांचे घरापर्यंत व शक्तीसिंग यांचे घर ते भगतसिंघ रोड पर्यंत व अबचलसिंघ यांचे घरा समोर व महेंद्रसिंघ कांचवाले यांचे घर ते मदनसिंघ खालसा यांच्या घरापर्यंत सी.सी. रस्ता करणे. (दुस-यांदा) | 3404264 | 35000/- | 70000/- | 640/- | 6 महिणे |
| 1273653-1 | 14 | नांवाशमनपा हद्दीत प्रभाग क्र.०८ मध्ये गोकुळनगर भागात श्री. अशोक चौधरी ते अजय मोदी यांच्या घरापर्यंत सी.सी. रस्ता करणे. (दुस-यांदा) | 774299/- | 8000/- | 16000/- | 640/- | 6 महिणे |

**अटी व शर्ती**

**A) निविदाधारकांनी निविदेसोबत खालीलप्रमाणे कागदपत्रांच्या स्वसाक्षांकीत छायाप्रती तांत्रिक लिफाफ्यात ऑनलाईन सादर करणे बंधनकारक आहे.**

* विदयुत कामांसाठी

- महाराष्ट्र शासनाचे सार्वजनिक बांधकाम विभाग/मुख्य विदयुत निरीक्षक मुंबई यांचेकडील विदयुत ठेकेदाराची चालू योग्य त्या वर्गाची अनुज्ञाप्ती प्रमाणपत्राची सत्यप्रत सादर करणे आवश्यक आहे.
- विदयुत व्यवस्थेचे कमीत कमी तीन कामे केल्याचे अनुभव प्रमाणपत्र सत्यप्रत सादर करणे आवश्यक आहे.
- Site Visit Report ( अ.क्र.०५ व १० वरील विदयुत कामांसाठी आवश्यक आहे.)

१) निविदाधारकांनी इसारा रक्कम (EMD) आणि निविदा शुल्क (Tender Fee) भरणा केलेली कागदपत्रे स्कॅन/छायांकित प्रत दाखल करणे बंधनकारक आहे.

२) महाराष्ट्र दुकाने व आस्थापणा अधिनियम २०१८ अन्वये नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

३) सार्वजनिक बांधकाम विभाग,महाराष्ट्र शासन यांचे कडील नोंदणी प्रमाणपत्राची सत्यप्रत सादर करणे आवश्यक आहे.

४) वस्तू व सेवा कर विभाग, महाराष्ट्र शासन यांचे कडील नोंदणी प्रमाणपत्राची सत्यप्रत सादर करणे आवश्यक आहे.

५) EPF व ESIC नोंदणीकृत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

६) सन- २०२१-२२, २०२२-२३,२०२३-२४ या तीन वर्षाचा आयकर (Income Tax) चा भरणा केल्याचे प्रमाण पत्र सादर करणे आवश्यक आहे.

७) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग,शासन निर्णय क्र. सीएटी-२०२२/ प्र.क्र./ इमा-२ दि.११.०५.२०२२ अन्वये निविदाधारकांनी निविदेसाठी कामाचे नाव टाकून निविदेसोबत जोडण्यात आलेली सर्व कागदपत्रे खरी असल्याबाबतचे मुद्रांकवरचे प्रतिज्ञापत्र १००/- रुपयाच्या मुळ स्टॅम्प पेपरवर प्रत्येक निविदेसाठी स्वतंत्र टाकून जोडणे बंधनकारक आहे.

८)महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १० (फ) नुसार महापालिका पदाधिकारी यांचेशी निविदा संदर्भात प्रत्यक्ष/ अप्रत्यक्ष संबंध नसल्याचे लेटर हेडवर स्वयंघोषणपत्र सादर करणे बंधन कारक राहील.

९) सिमेंट कॉक्रीटचे कामासाठी लागणारी मशिनरी स्वत:च्या मालकीचे असल्यास मशिनरीच्या कागदपत्राचा पुरावा दाखल्याची प्रत सादर करणे आवश्यक आहे. सिमेंट कॉक्रीटचे कामासाठी लागणारी मशिनरी स्वत:च्या मालकीचे नसल्यास त्याबाबतचा वैध भाडे करारनामा सादर करणे आवश्यक आहे.

१०) विद्युत कामासाठी कंत्राटदाराने विद्युत कंत्राटदाराशी करारनामा करुन, करारनामा व विद्युत कंत्राटदाराचे नोंदणी प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

११) सन- २०२०-२१,२०२१-२२, २०२२-२३, २०२३-२४,२०२४-२५ या पाच वर्षातील कंत्राटदाराची कमाल वार्षिक ऊलाढाल प्रत्येक कामाच्या ७०% असणे आवश्यक आहे.

१२) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन परिपत्रक क्र.संकीर्ण २०१९/प्र.क्र. ४७/इमारती-२ दि.२५.१०.२०१९ अन्वये निविदाधारकांनी सन- २०२०-२१,२०२१-२२, २०२२-२३, २०२३-२४,२०२४-२५ या पाच वर्षात तुल्यबळ किंमतीचे किमान १ व त्याच स्वरुपाचे काम पुर्ण केले असले पाहिजे, त्याची कमीत कमी किंमत शासन परिपत्रकातील तरतुदीनुसार असणे आवश्यक आहे.

१३) निविदाधारकांनी सन- २०२०-२१,२०२१-२२, २०२२-२३, २०२३-२४,२०२४-२५ या पाच वर्षापैकी कोणत्याही ०१ वर्षात ज्या महत्वाच्या परिमाणाच्या बाबी करावयाचे आहे, त्याचे कमीत कमी परिमाण महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन परिपत्रक क्र.संकीर्ण २०१९/प्र.क्र. ४७/इमारती-२ दि.२५ ऑक्टो.२०१९ अन्वये असणे आवश्यक प्रस्तावित कामाच्या अंदाजपत्रकातील जास्त परिमाण असणा-या पाच बाबींचे परिमाण स्वतंत्र प्रपत्रात नमुद करण्यात यावे.

१४) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन परिपत्रक क्र.सीएटी-२०२२/प्र.क्र.५०/ इमा.२ दि.११.०५.२०२२ व दि.१२.०५.२०२२ अन्वये नुसार ५०.०० लक्षा पेक्षा जास्त किंमतीच्या सर्वच निविदा मध्ये Bid Capacity ची अट समाविष्ट करण्याबाबत नमुद कले आहे. तथापी एकाच कंत्राटदाराने एका वित्तीय वर्षात तीन किंवा त्यापेक्षा जास्त कामे घेतली असल्यास त्याच्यासाठी त्या वित्तीय वर्षात पुढील निविदांसाठी बीड कॅपीसीटीची शर्ती लागू राहील. करीत चालु वित्तीय वर्षात हाती घेतलेले सर्व कामांची निविदा विषयक माहिती सादर करणे कंत्राटदारास बंधनकारक राहील.

बिड कॅपॅसिटी= (अXएन X२-बी)

अ- गेल्या ५ (पाच) वर्षातील जास्तीत जास्त वार्षीक उलाढाल चालु दराने

एन- देय कामाचा कालावधी (वर्ष)

बी- हातातील कामाची किंमत (देय कामाच्या कालावधीतील)

Bid Capacity काढण्यासाठी या निविदे सुचने सोबत दिलेल्या प्रपत्रात माहिती देणे आवश्यक असुन सदर माहिती उप अभियंता या पेक्षा कमी नसणा-या दर्जाच्या अधिकारी यांनी प्रमाणीत केलेली Bid Capacity प्रत.)

**B) निविदाधारकांनी निविदेसोबत वाणिज्यि क लिफाफा केवळ ब-१ नमुन्यात ऑनलाईन सादर करणे बंधनकारक आहे.**

**C) इतर अटी व शर्ती**

**१) निविदाधारकांनी ई-निविदा पोर्टलवर "बिड लॉक" झाल्यानंतर निविदेची "हार्ड कॉपी" ची १ प्रत दि.२०.०४.२०२६ रोजी दुपारी १५.०० पर्यत कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, कक्ष क्रमांक १०६, तळमजला, महानगपालिका भवन, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड सादर करणे बंधनकारक आहे.**

२) तांत्रिक लिफाफा मध्ये तसेच निविदा मंजुरी व नंतर देयके अदा करताना जोडलेली कागदपत्रे खोटी व बनावट असल्याची बाब निविदा उघडल्यानंतर निदर्शनास आल्यास त्यासनिविदाधारक/ कंत्राटदार पूर्णपणे जबाबदार राहतील.

३)सदर कामाच्या विशिष्ट स्वरुपानुसार समकक्ष काम निविदाधारक यांनी प्रत्यक्ष केलेले असणे अनिवार्य आहे.

४) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन परिपत्रक क्र.सीएटी २०१७/ प्र.क्र.८/इमा- २ दि.२७.०९.२०१८ मधील शुध्दीपत्रक दि.२६ नोव्हेंबर, २०१८ नुसार लिफाफा क्र. १ व लिफाफा क्र.२ उघडल्यानंतर प्रथम न्युनतम देकार सादर करणा-या L-१ निविदाकाराने "Additional Performance Secutity Deposit" आठ दिवसाच्या आत संबंधीत कार्यकारी अभियंता यांचे कडे जमा करावे.

उदा:- देकार १९ % पेक्षी कमी दराचा असल्यास

१० % कमी दरापर्यंत १ % व

१५ % कमी दरापर्यंत (१५ % -१०% = ५%)

तसेच (१९-१५) = ४ % करीता (४x२=) ८ % असे एकुण (१+५+८) = १४ %)

५) निविदाधारक यांनी इसारा रक्कम E- Tender या संकेतस्थळाच्या Online Payment Gatewayव्दारे भरणा करावी.

६) निविदाधारक यांनी त्यांचेकडील कंत्राटी कामगार/मजुर यांचा EPF व ESIC चा भरणा वेळेच्या आत करणे आवश्यक आहे. तसेच तसेच त्यांना मिळालेल्या कामामधुन EPF व ESIC कामगारांचे नांवासहीत यादीसह चालान भरणा करणे आवश्यक आहे. याबाबतची संपुर्ण जबाबदारी निविदा धारकाची राहील.

७) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१८/ प्र.क्र.१५१/ इमारती-२ दि. १४.०१.२०१९ अन्वये दोष दुरुस्तीचा कालावधी (Defect liability Period) राहील.

८)कंत्राटदाराने कामाचे कार्यारंभ आदेश दिल्यानंतर शासकिय विमा कंपनी कडुन विमा पॉलीसी काढणे अनिवार्य आहे.

९) कामाच्या प्रशासकिय मान्यतेमध्ये नमुद सर्व अटी शर्ती लागु राहतील.

१०) शासनाची प्रचलित B-1 निविदा पध्दती लागु राहील.

११) निविदे अंतर्गत कामांसाठी भाववाढ कलम लागु राहणार नाही.

१२) निविदा पुस्तिकेतील सर्व अटी व शती लागु राहतील.

१३) कामाच्या गुणवत्तेसाठी प्रचलित MORTH, RED BOOK, IS CODE, IRC, NBC मधील निकष लागु राहतील.

१४) कामांसाठी आवश्यक साहीत्य नामांकित कंपनीचे ISI MARK चे असणे आवश्यक आहे.

१५) कामांतर्गत महत्वाच्या बाबीची गुणवत्ता तपासणी वारंवारीतेनुसार घेणे बंधनकारक राहील.

१६) वस्तु व सेवा कराची रक्कम नियमानुसार अदा करण्यात येईल.

१७)सदर कामां अंतर्गत मा.जिल्हाधिकारी, नांदेड यांच्या प्रशासकीय मान्यता व निधी उपलब्धतेनुसार काम हातीघेण्यात येईल.सदर कामाची प्रशासकिय मान्यता व निधी मिळाली नसल्यास निविदा रद्द करण्याचा अधिकार मा. आयुक्त यांनी राखुन ठेवला आहे.

१८)आपल्या क्षेत्रातील रस्ते सुस्थितीत राहतील याची सव्रस्वी जबाबदारी आपली राहणार असून अपघात प्रवण क्षेत्र व स्थळ संबंधित अभियंता यांचे निदर्शनास आणून त्यांचे देखरेखीखाली रस्ता सुस्थितीत राहील याची दक्षता घ्यावी.

१९) निविदा धारकास या महानगरपालिकेने कोणत्याही कारणास्तव निविदा भरण्यास प्रतिबंध केलेला नसावा अथवा काळया यादीत टाकलेले नसावे असल्यास अशा निविदा धारकांची निविदा स्विकारण्यात येणार नाही.

२०) सदर कामा बाबत भविष्यात काही वाद निर्माण झाल्यास न्यायीक प्रकरण मा.जिल्हा व सत्र न्यायालय,नांदेड पूरते मर्यादित राहील.

२१) कोणत्याही कारणाशिवाय एक किंवा सर्व निविदा नाकारण्याचे अधिकार आयुक्तांनी राखून ठेवलेले आहेत.

अति.आयुक्त,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड

प्रतिलीपी :-

१)नोटीस बोर्ड नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड.

२)ई-टेंडरींग विभाग/संगणक विभाग नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड

## नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

पत्ता:- वजिराबाद नांदेड ई- मेल पत्ता :- info@nwmcnanded.org दुरध्वनी (०२४६२) २३४४०४फॅक्स क्र. (०२४६२)

ई-निविदा सुचना जा.क्र.नांवाशमनपा/साबांवि/ 213 /२०२६/ 214 /२०२६ दि. 07/04/2026

आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडुन योग्य त्या वर्गातील नोदणीकृत कंत्राटदाराकडुन नमुद कामांकरीता नांवाशमनपा हद्दितील लोकशाहीर अण्णा भाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजने अंतर्गत व नागरी दलितेत्तर वस्ती सुधार योजने अंतर्गत व मनपाचे कामे करणे इत्यादी कामे ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र संकेतस्थळावर https://mahatenders.gov.in येथुन डाऊनलोड़ करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांनी राखुन ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. (निविदा अटी/ शर्ती संकेतस्थळावर ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे. सदर निविदा सुचने मध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.

अति.आयुक्त,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड

प्रति :
संपादक दैनिक पुढारी (राज्यस्तर) ८X१२ चौ.से.मी./ दैनिक प्रजावाणी ८X१२ चौ.से.मी.
यांना देवून विनंती करण्यात येते की, सदरील निविदा सुचना आपल्या दिनांक.०८.०४.२०२६ च्या वृत्तपत्रात वर दिलेल्या आकारमानात जागेत प्रसिध्द करुन बिलाच्या (०२) प्रति शासनाच्या मान्यतेच्या प्रतीसह सादर करावे.

अति.आयुक्त,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड